# संविधानवादी साहित्य सिद्धांताचे स्वरूप

**अनंत दा. राऊत**

माजी मराठी विभागप्रमुख, पीपल्स कॉलेज नांदेड.

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17260140

## ABSTRACT:

प्रस्तुत शोधनिबंध माझ्या 'संविधानवादी साहित्य सिद्धांत आणि दिशा' या ग्रंथावर आधारित आहे. मराठीमध्ये किंवा कुठल्याही भारतीय भाषांमध्ये आज संविधानवादी साहित्य अस्तित्वात नाही. संविधानवादी साहित्याचा सिद्धांत मांडून असा साहित्यप्रवाह उदयाला येऊ शकेल काय? मी हे खात्रीपूर्वक सांगेन की असा साहित्यप्रवाह निश्चितच उदयाला येऊ शकतो. आणि त्याला असंख्य धुमारे फुटून तो मोठ्या प्रमाणात विकसित होऊ शकतो. कारण भारत भूमीमध्ये संविधानवादी साहित्यप्रवाह उदयाला येण्यासाठी व विकसित होण्यासाठी खूप मोठा तात्त्विक, मूल्यात्मक व जीवनानुभवविषयक आधार आहे. भारतीय समाजजीवनामध्ये उपलब्ध असलेली वैविध्यपूर्ण अनुभव सामुग्री संविधानवादी जीवनदृष्टी असलेल्या प्रतिभावंत साहित्यिकाचा स्पर्श होण्याची आतुरतेने वाट पाहत आहे. परंतु सुस्पष्ट अशी संविधानवादी जीवनदृष्टी लाभलेले साहित्यिकच इथे अस्तित्वात नाहीत. म्हणून जे संविधानवादी साहित्य निदान १९५५ ते ६० पासूनच निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू व्हावयास हवी होती. परंतु ती झाली नाही. ती प्रक्रिया सुरू न होण्याची कारणे भारतातील विशिष्ट समाज व्यवस्थेत दडलेली आहेत. हा सिद्धांत मांडत असताना त्या साऱ्या कारणांचा शोध घ्यायचा आहे.

## KEYWORDS:

संविधानवादी साहित्य सिद्धांत, साहित्यिकांचे स्तर, विशाल जीवनदृष्टी, सिद्धांत, भारतीय समाजजीवन.

संविधानवादी साहित्याचे सिद्धांतन करत असताना प्रथम वर्तमानात मराठीमध्ये लेखन करणाऱ्या साहित्यिकांचे स्तर कोणते आहेत, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. साहित्यिकाच्या मनोवृत्तीवरून त्याचा व त्याच्या साहित्याचा स्तर ठरत असतो. संविधानवादी साहित्य वर्तमानात अस्तित्वात नाही. कारण सुस्पष्ट अशा संविधानवादी मनोवृत्तीचे साहित्यिक वर्तमानात अस्तित्वात नाहीत. वर्तमान साहित्यिकांच्या मनोवृत्तीचा स्तर लक्षात घेतल्याशिवाय संविधानवादी साहित्यिकाच्या मनोवृत्तीचा स्तर कसा असतो ते नक्की करता येणार नाही. आणि वर्तमानातील साहित्यिकांची मनोवृत्ती बदलून ती संविधानवादी कशी बनवता येईल याच्या दिशाही देता येऊ शकणार नाहीत. म्हणून मी प्रथम वर्तमान साहित्यिकांचे स्तर निश्चितीकरणार आहे.

**(अ) साहित्यिकांचे स्तर:**

साहित्यिकाची जीवनदृष्टी कोणत्या स्वरूपाची आहे, यावरून साहित्यिकांचे काही स्तर ठरवता येऊ शकतात. बहुतांश साहित्यिकांची जीवनदृष्टी त्यांच्या वर्तमान कालखंडातील त्यांच्या सभोवतीची भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतिक परिस्थिती निश्चित करत असते. परंतु असेही काही साहित्यिक असतात की त्यांच्या व्यक्तिगत स्वभावावरून त्यांची विशिष्ट अशी जीवनदृष्टी बनलेली असते. जे साहित्यिक आत्मकेंद्रित वृत्तीचे असतात, ते स्वतःच्या पलीकडे फारसे पाहू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना स्वतःचे व्यक्तिगत अनुभव, भावभावना हेच सर्वाधिक महत्त्वाचे वाटतात. असे साहित्यिक लघु दृष्टीचे असतात. काही साहित्यिक केवळ एक व्यक्ती म्हणूनच जीवनाचा विचार करत नाहीत, तर आपल्या सभोवतालकडे काहीशा गंभीरपणाने पाहतात. त्यांना स्वतःच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच स्वत:चा समाज, सभोवतालच्या अनुभवाला येणाऱ्या वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्ती हे सारे महत्त्वाचे वाटते. असे लेखक आपल्या साहित्यातून केवळ व्यक्तिगत अनुभव चित्रित करत नाहीत तर सामाजिक जाणिवाही प्रकट करतात. अशा साहित्यिकांना मध्यम जीवनदृष्टीचे साहित्यिक असे म्हणता येईल. काही साहित्यिकांचा स्वभावधर्म केवळ व्यक्तिगत अनुभवांमध्ये रमणारा नसतो किंवा आपला सभोवताल पाहून तेवढ्यापुरतीच जीवनदृष्टी ठेवणारा नसतो, तर त्यांना समग्र मानवी जीवन समजून घेण्याचा ध्यास

असतो. अशा प्रकारच्या साहित्यिकांना विशाल दृष्टीचे साहित्यिक असे म्हणता येईल.

पुराणगुंगे साहित्यिक, कल्पितात रमणारे साहित्यिक, लघु जीवनदृष्टीचे साहित्यिक, मध्यम जीवनदृष्टीचे साहित्यिक व विशाल जीवनदृष्टीचे साहित्यिक असे साहित्यिकांचे स्तर असतात. संविधानवादी लेखकाचा समावेश विशाल जीवनदृष्टीच्या साहित्यिकांमध्ये करावा लागतो. कुणीतरी आदेश दिल्याने कलावंत आपल्या कलेची निर्मिती करत नसतो. भारत शासनाने देशातील साहित्यिकांना तुम्ही संविधानवादी साहित्याची निर्मिती करा अशा प्रकारचा आदेश दिला, तर भारतीय साहित्यिक उत्कृष्ट अशा संविधानवादी साहित्याची निर्मिती करू शकतील काय? या प्रश्नाचे उत्तर नाही, असे द्यावे लागेल. कारण उत्कृष्ट साहित्य निर्मिती ही आदेश देऊन करून घेण्याची गोष्ट नसते, तर विशिष्ट विषय-आशयावर आधारलेली साहित्यकृती विशिष्ट भावविश्व असलेली व्यक्तीच निर्माण करू शकत असते. साहित्यिकाचे विशिष्ट भावविश्वदेखील नैसर्गिक नसते तर ते सभोवतीच्या सांस्कृतिक पर्यावरणात घडत असते. संविधानवादी साहित्यिक घडवण्यासाठीदेखील एक विशाल असे सांस्कृतिक वातावरण जाणीवपूर्वक निर्माण करण्याची गरज असते.

**अपेक्षित प्रश्नांची उत्तरे:**

संविधानवादी साहित्य सिद्धांतासंदर्भात काही प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात. उदाहरणार्थ संविधानवादी साहित्याचा स्वता:चा सुभा कशासाठी? असा प्रश्न वर्तमानात विविध साहित्य प्रवाहांमध्ये साहित्य निर्मितीचा, समीक्षेचा अथवा साहित्याच्या प्रचार-प्रसाराचा व्यवहार करणाऱ्या काही मंडळींच्या मनात निर्माण होऊ शकतो. ते असा प्रश्न उपस्थित करू शकतात की १९६० नंतर निर्माण झालेल्या दलित, ग्रामीण, स्त्रीवादी इत्यादी साहित्य प्रवाहातील साहित्यामध्ये संविधान मूल्ये येतातच. मग हेच प्रवाह अधिक सकस बनवण्याचा प्रयत्न करण्याऐवजी संविधानवादी साहित्याचे वेगळे सिद्धांत कशासाठी? अशा प्रकारच्या अपेक्षित प्रश्नाला उत्तर देणे मी माझे कर्तव्य समजतो. माझे असे मत आहे की, दलित, ग्रामीण, स्त्रीवादी इत्यादी साहित्य प्रवाह महत्त्वाचेच आहेत. त्यातून संविधान मूल्यांचा पुरस्कार केलेला नक्कीच

दिसून येईल. तरीही त्यांना परिपूर्णपणे संविधानवादी साहित्य प्रवाह असे म्हणता येणार नाही. कारण त्या प्रवाहातील साहित्याच्या अनुभव द्रव्याला संविधानवादी भूमिकेच्या दृष्टिकोनातून अनेक मर्यादा असल्याचे दिसून येते. म्हणून वर्तमानातील छोट्या-मोठ्या साहित्य प्रवाहाना स्वतःच्या पोटात सामावून घेणारा सर्वसमावेशक असा संविधानवादी साहित्य प्रवाह निर्माण होणे अत्यावश्यक आहे.

### (इ) सिद्धांत म्हणजे काय?

सिद्धांत या शब्दाच्या माध्यमातून अनेक अर्थांचे सूचन होते. सिद्धांत म्हणजे काहीतरी सिद्ध करणे, परंतु सिद्धांतामध्ये संपूर्णपणे नवीच गोष्ट सिद्ध केली जात असते असे मात्र म्हणता येणार नाही. कारण आधी अस्तित्वात असलेल्या गोष्टींचे संशोधन करून त्या संशोधनातून समोर आलेल्या तथ्यांचे कथन म्हणजे सिद्धांत असते. सिद्धांताचे दोन प्रकार करता येऊ शकतात. एक भौगोलिक किंवा भौतिक गोष्टींच्या संदर्भातील सिद्धांत आणि दोन मानव्यशास्त्रीय सिद्धांत. भौगोलिक सिद्धांतांमध्ये प्रत्यक्ष निरीक्षण व काही प्रयोगांच्याद्वारे प्रक्रिया करून काही तत्त्वांची मांडणी केली जात असते. अशा सिद्धांतांच्याद्वारे विश्वाच्या संदर्भात काही तथ्यांची व सत्याची मांडणी केली जात असते. त्याचबरोबर आधीच्या काळातील मंडळींनी केलेली मांडणी सत्य आहे की असत्य याचेही कथन प्रत्यक्ष पुराव्याच्या आधारे केले जात असते. उदाहरणार्थ पृथ्वी ही सपाट आहे, असे धार्मिक क्षेत्रातल्या मंडळींनी सांगितले होते. परंतु नंतरच्या काळातील वैज्ञानिकांनी प्रत्यक्ष निरीक्षणाच्याद्वारे पृथ्वी हीच सपाट नसून गोल आहे, हे पुराव्यासह सिद्ध केले. आधीच्या काळात धर्मसंस्था असे सांगत होती की, सूर्य पृथ्वीभोवती फिरतो. वैज्ञानिकांनी प्रत्यक्ष निरीक्षणातून हे सिद्ध केले की सूर्य हा पृथ्वीभोवती फिरत नसून पृथ्वीच सूर्याभोवती फिरते. गुरुत्वाकर्षण सिद्धांताच्या संदर्भातही असे म्हणता येईल की, पृथ्वीमध्ये गुरुत्वाकर्षण शक्ती असल्यामुळे उंच फेकलेली कोणतीही वस्तू परत पृथ्वीवर येते. हे सारे खगोलशास्त्रीय सिद्धांत झाले. अशा प्रकारच्या सिद्धांतात पुन्हा वेगळे काही सांगण्यास, सिद्ध करण्यास किंवा खोडण्यास फारशी जागा नसते. सिद्धांताच्या संदर्भात असेही म्हटले जाते की सिद्धांत म्हणजे एखादी विशिष्ट गोष्ट अस्तित्वात असल्याचे सिद्ध करणे किंवा विशिष्ट गोष्ट अस्तित्वात येऊ शकते हे सिद्ध करणे. जी एखादी गोष्ट

सिद्ध केली गेली तिच्या पलीकडे आता काहीही असू शकत नाही. हे अंतिम आहे. त्याला सिद्धांत असे म्हणावे. उदाहरणार्थ सजीव प्राणी प्रजननक्षम असतात. हा जीवशास्त्रीय सिद्धांत झाला. यामध्ये खोडण्यासारखे आणि नवे काही सांगण्यासारखे शिल्लक नसते. अशा प्रकारची एखादी गोष्ट सिद्ध केली गेली तिच्या पलीकडे आता काहीही असू शकत नाही. ही मांडणी अंतिम आहे. यामध्ये संशोधन करण्याचा अंत झाला. म्हणजे सिद्ध करण्याचा अंत झाला. म्हणजे सिद्धांत झाला. अशीही मांडणी केली जाते.

वेगवेगळया भौतिक गोष्टींच्या संदर्भातील वैज्ञानिक सिद्धांतामध्ये देखील संशोधन हे करावेच लागते. या संशोधनामध्ये केवळ निरीक्षण असते असे नाही, तर वेगवेगळया स्वरूपाच्या प्रयोगांच्यामधून वेगवेगळया प्रक्रियादेखील दिल्या जात असतात. अशा प्रकारच्या प्रक्रियांमधून जे परिणाम होतात आणि जे काही तथ्य समोर येते ते तथ्य म्हणजेच सिद्धांतन असते. विज्ञानाच्या क्षेत्रात आजवर जे अनेकविध प्रकारचे संशोधन झालेले आहे, आणि या संशोधनातून जे सिद्धांत मांडले गेले आहेत त्या सिद्धांतांचा मानवी जीवनाला फार मोठा लाभ झालेला आहे. वैज्ञानिक क्षेत्रातील संशोधनामध्ये विश्वातील अनेकविध घटकांचा शोध घेतला जात असतो. विश्वामध्ये अस्तित्वात असलेल्या विविध शक्ती आणि विश्वाचे विविध नियम या साऱ्यांवर विशिष्ट प्रक्रिया करून त्या त्या निसर्ग शक्ती आणि निसर्ग नियमानुसार मानवी जीवन अधिकात अधिक सुखकर होण्यासाठी झाला पाहिजे. मानवाला ज्या गोष्टी शक्य होऊ शकत नाहीत, त्या अनेकविध गोष्टी शक्यतेच्या पातळीवर आणण्याचा प्रयत्न वैज्ञानिक संशोधनातून केला जात असतो. उदाहरणार्थ मानवाला पंख नसले तरी विमानाच्या साह्याने प्रचंड गतिमानतेने आभाळातून प्रवास करणे. मानवाच्या बोलण्याचा आवाज हा विश्वातील ध्वनी लहरींच्या माध्यमातून साता समुद्राच्या पलीकडे कितीही दूर जाऊ शकतो, त्यासाठी त्या ध्वनिलहरी पकडण्याची काहीएक तांत्रिक यंत्रणा उभी केली पाहिजे. ती यंत्रणा उभी केली की माणसाचा आवाज हवा तेव्हा, हवा तिथे पोहोचू शकतो. केवळ आवाजच पोहोचू शकतो असे नाही, तर माणसाचे किंवा जीवनाचे कोणतेही जिवंत चित्र, माणसाने लिहिलेली अक्षरे, हे सारेच सॅटॅलाइटच्या माध्यमातून काही क्षणात कितीही दूरच्या अंतरावर पोचवता येऊ शकतात हे आजच्या

इंटरनेटच्या संशोधनातून सिद्ध झाले आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इत्यादीमध्ये झालेल्या संशोधनाच्या माध्यमातून वैज्ञानिकांनी असंख्य गोष्टी पुराव्यासह सिद्ध केल्या आणि त्या गोष्टींचा मानवी जीवनाला प्रत्यक्ष लाभ मिळवून दिला. असे हे सिद्धांतन वैज्ञानिक सिद्धांतामध्ये मोडते.

मानव्यशास्त्रीय सिद्धांत हे मानवी मन व मानवाने निर्माण केलेल्या अनेकविध सांस्कृतिक घटकांच्या निरीक्षणातून मांडले जात असतात. मानव्यशास्त्रांमध्ये मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, साहित्यशास्त्र इत्यादींचा समावेश होतो. अशा प्रकारच्या मानव्यशास्त्रांमध्ये मांडले जाणारे सिद्धांत अंतिम स्वरूपाचे मात्र नसतात, त्या सिद्धांतांच्या संदर्भात आता नवे काही सांगण्यास कुठलीच जागा नाही, किंवा त्यात नवी भर घालण्यास जागाच नसते असे म्हणता येत नाही. मानव्यशास्त्रीय सिद्धांत खोडता येऊ शकतात. त्या सिद्धांतांमध्ये नवी भर टाकता येऊ शकते. किंवा विशिष्ट गृहितकाच्या माध्यमातून तशाच प्रकारचे नवे सिद्धांतही मांडले जाऊ शकतात.

शब्दकोशांनी सिद्धांत या शब्दाचा नेमका कोणता अर्थ सांगितलेला आहे, हेही इथे लक्षात घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केलेल्या मराठी शब्दकोशाच्या सहाव्या खंडात सिद्धांत या शब्दाचा अर्थ अनेक पद्धतींनी मांडलेला दिसतो. त्यात असे म्हटले आहे की सिद्धांत म्हणजे (१) प्रमाणानुरोधाने ठरलेला निर्णय, संशोधनादिकांचे फल (२) प्रतिपादित तत्त्व, प्रस्थापित सत्य (३) तत्त्वाचे कथन; परमतत्त्व (४) निश्चय, निर्णय (५) नियम प्रमेय सारणी (६) ज्योतिषग्रंथ उदा. सूर्य सिद्धांत (७) पक्की वज्रलेप गोष्ट (८) शास्त्रीय भूमिका.

सिद्धांत या शब्दाचा अर्थ याच शब्दकोशात 'सिद्धांताचे कथन किंवा सिद्धांताचा अभ्यासक; सिद्धांत काढण्याची क्रिया' असाही दिला आहे. यामध्ये सिद्धांत या शब्दाचे केलेले विश्लेषणही लक्षात घेण्यासारखे आहे. ते असे: १. सिद्धांत ग्रंथाचा अभ्यासक २. प्रयोग करून पाहणारा, सिद्धांत ठरवणारा ३. कोणतेही सत्य तत्त्व वगैरे प्रस्थापित करणारा असा दिला आहे. 'मराठी शब्दरत्नाकर' या शब्दकोशामध्ये वा. गो. आपटे यांनी सिद्धांत या शब्दाचा अर्थ गुरुप्रतीती, निश्चित मत, निर्णय,

उपपत्तीयुक्त ग्रंथ असा दिला आहे.

सिद्धांत ही संकल्पना व्यवस्थितपणे समजून घेण्यासाठी सदरील शब्दकोशांनी दिलेले अर्थ चांगल्याप्रकारे उपयुक्त ठरू शकतात. विश्वातील सत्याच्या संदर्भात, प्रमाण म्हणजेच पुरावा देऊन हे हे विश्वाच्या संदर्भातील सत्य आहे, अशा प्रकारचा निर्णय देणे. असा निर्णय देण्यासाठी निरीक्षण व प्रयोगाच्या द्वारे संशोधन हे करावेच लागते. अशा प्रकारच्या संशोधनाचे फलित म्हणजेच सिद्धांत असतो. संशोधनाच्या माध्यमातून या तथ्यांच्या संदर्भामध्ये काही तत्त्वांचे प्रतिपादन केले जात असते. ती तत्त्वे प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जात असतो. अशा प्रकारच्या विशिष्ट तत्त्वांच्या प्रस्थापनेची मांडणी म्हणजेच सिद्धांत असतो. सिद्धांतामध्ये विश्वाच्या संदर्भातील किंवा मानवी समाज व संस्कृतीच्या संदर्भातील मूलभूत तथ्यांचे कथन केले जात असते. सिद्धांतनमध्ये, विशेषतः मानव्यशास्त्रीय सिद्धांतनमध्ये काही कल्पित स्वरूपाची गृहितके निश्चित केली जात असतात.

**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.